## १० वर्षापूर्वी प्रेयसीचा खुन करुन पुरावा नष्ट करणाऱ्या वेश्या व्यवसायाचे रॅकेट चालविणाऱ्या गुन्हेगारास गुंडा विरोधी पथक (उत्तर) कडून अटक

गुंडा विरोधी पथकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मिलिंद गायकवाड यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे संतोष नंदकिशोर कातोरे, रा. श्रॉफ सृष्टी, म्हाळूंगे, ता. मुळशी, जि. पुणे याने त्याची प्रेयसी नामे अर्चना दगडू सांगळे हिचे सोबत संयुक्त नावाने दिनांक १५/१२/२००५ रोजी संस्कृती प्रांगण, बाणेर येथे फ्लॅट खरेदी केलेला होता. सदर महिला अर्चना सांगळे ही दिनांक ०४/११/२००६ रोजी पासून बेपत्ता असलेबाबत तिचे वडील नामे दगडू भाऊराव सांगळे यांनी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिलेली होती. ती मिळून आलेली नसतानाही संतोष कातोरे याने अर्चना सांगळे हिचे जागी बनावट महिलेच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करुन सदर फ्लॅट दिनांक ०६/०२/२०१२ रोजी अभिहस्तांतरण पत्राद्वारे स्वतःचे नावावर करुन सदर फ्लॅटची दिनांक १४/०९/२०१४ रोजी विक्री केलेली आहे.

सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, सदर महिला दिनांक ०४/११/२००६ रोजी बेपत्ता झालेबाबत चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन येथे मनुष्य मिसिंग नं. ३२३/०६ अन्वये तक्रार दाखल असून सदरबाबत दिनांक २६/०५/२००७ रोजी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन येथे गुरनं. २८४/०७, भादवि क. ३६४ अन्वये गुन्हा दाखल होऊन त्यामध्ये संतोष नंदकिशोर कातोरे यास अटक करण्यात आलेली होती. सदर गुन्हयातून संतोष कातोरे याची सीआरपीसी क. १६९ प्रमाणे मुक्तता करण्यात आलेली होती. तसेच संतोष कातोरे याने वर नमूद फ्लॅटची अर्चना सांगळे हिचे जागी दुसरी महिला हजर ठेवून बनावट कागदपत्रे सादर करुन दिनांक १४/०९/२०१४ रोजी विक्री केल्याची माहिती दुय्यम निबंधक कार्यालय, क्र. १९, हवेली येथून प्राप्त झाली.

सदर मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संतोष नंदकिशोर कातोरे याचेविरुध्द खडकी पोलीस स्टेशन येथे गुरनं. १५/१७, भादवि क. ४२०, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी संतोष कातोरे यास दिनांक १७/०१/२०१७ रोजी अटक करण्यात येऊन त्याचेकडे केलेल्या चौकशीमध्ये संतोष कातोरे याने बेपत्ता महिला नामे अर्चना दगडु सांगळे ही वर नमूद फ्लॅटचे विक्री करण्याचे वादातून तिला दिनांक ०१/११/२००६ रोजी कोल्हापूर येथे देवदर्शनाकरीता घेऊन गेला व कोल्हापूर येथून परत येत असताना संतोष कातोरे याने त्याचे दोन साथीदारांसोबत मिळून अर्चना सांगळे हीला हाताने मारहाण करुन व गळा आवळून तिचा खुन केला व तिचा मृतदेह किल्ले मच्छिंद्रगड, ता. वाळवा. जि. सांगली येथे टाकून दिल्याचे निष्पन्न झाले. सदरबाबत इस्लामपूर पोलीस स्टेशन गुरनं. १५२/०६, भादवि क. ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपी नामे संतोष नंदकिशोर कातोरे हा पूर्वी पुणे शहरामध्ये वेश्या व्यवसायाचे रॅकेट चालवत होता. त्याचेवर हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ३०४८/१४, पिटा ॲक्ट क. ३,४,५,७ अन्वये गुन्हा दाखल आहे. संतोष कातोरे याने २ वर्षापूर्वी सूर्यप्रकाश फाऊंडेशन या नावाने अशासकीय सामाजिक संस्था स्थापन केली आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पी.आर.पाटील, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, अरुण वालतूरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मिलिंद गायकवाड, सहा. पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे, सहा. फौज. नागेश भोसले, विष्णू पांडूळे, पोहवा अब्दुल करीम सय्यद, राजेंद्र मोरे, रमेश भिसे, शितल शिंदे, नाना जगताप, पोना दिनेश साबळे, पोशि कांतीलाल बनसुडे, नवनाथ चांदणे, दत्ता फुलसुंदर, सचिन कदम यांनी केलेली आहे.



